**नियमीत दिवाणी दावा क्र २०८/२०२३**
**संजय वि भिमराव**
**निशाणी क्र ६४**

**१.** पुराव्यावरुन खालील दस्तऐवजांना निशाणी देण्यात येते;

१. वादमिळकतीची शासनाने दिलेली सनद, निशाणी ६५.

२. कुर्डुवाडी नगर परिषदेची नोटीस, निशाणी ६६.

३. वादमिळकतीची आखिव पत्रीका, निशाणी ६७.

४. वादमिळकतीचा सिटी सर्व्हे नकाशा, निशाणी ६८.

५. सिसनं १३५० ची आखिव पत्रीका, निशाणी ६९.

६. सिसनं १३५० चा नकाशा, निशाणी ७०.

७. सिसनं १३५१ ची आखिव पत्रीका, निशाणी ७१.

८. सिसनं १३५१ चा नकाशा, निशाणी ७२.

९. सिसनं १३५६ ची आखिव पत्रीका, निशाणी ७३.

१०. सिसनं १३५६ चा नकाशा, निशाणी ७४.

११. सिसनं १३५०, १३५१, १३५५, १३५६ चा एकत्रीत नकाशा, निशाणी ७५.

१२. वादीने दिलेला तक्रारी अर्ज, निशाणी ७६.

१३. प्रतिवादींनी पाठविलेली नोटीस, निशाणी ७७.

१४. वादींनी पाठविलेली उत्तर-नोटीस, निशाणी ७८.

१५. पोस्ट पावती (३) व पोहोच पावती (३), निशाणी ७९.

**वादीचा शपथेवर उलटतपास सुरु प्रतिवादींतर्फे वकील, श्री देशमुख**

**२.** माझे वडिलांचे पुर्ण नांव बापूराव श्रीपती कांबळे आहे. माझ्या वडिलांना दोन भाऊ होते व त्यांची नावे बाजीराव आणि मुरलीधर आहे. वादमिळकतीचे क्षेत्र किती आहे मला नक्की सांगता येणार नाही. वादमिळकतीमध्ये माझे वडील, बाजीराव आणि मुरलीधर यांचा समान हिस्सा आहे. प्रतिवादी क्र १ ते ४ हे मुरलीधरचे वारस आहेत. वादमिळकत सर्वांच्या मध्ये मिळून सामाईक जागा आहे.

**३.** वादी क्र १ च्या स्वतःच्या जागेचा सिटी सर्व्हे क्रमांक १३५० आहे. वादमिळकतीच्या कोणत्या दिशेला सिटी सर्व्हे क्रमांक १३५० आहे हे मला सांगता येणार नाही. सिटी सर्व्हे क्रमांक १३५० चे क्षेत्र २२.५ आहे.

प्रश्न - सदर क्षेत्र चौरस मीटर आहे की चौरस फूटमध्ये आहे?

उत्तर - मला सांगता येणार नाही.

**४.** वादी क्र २ माझा सख्खा चुलत भाऊ आहे. वादी क्र २ च्या स्वतःच्या मिळकतीचा क्रमांक सिटी सर्व्हे क्रमांक १३५१ आहे. सिटी सर्व्हे क्रमांक १३५१ चे क्षेत्र किती आहे मला सांगता येणार नाही. सर्व्हे क्रमांक १३५१ ची जागा वादमिळकतीच्या कोणत्या दिशेला आहे मला सांगता येणार नाही.

**५.** प्रतिवादी क्र १ ते ४ यांच्या स्वतःच्या मिळकतीचा क्रमांक सिटी सर्व्हे क्रमांक १३५६ आहे. सिटी सर्व्हे क्रमांक १३५६ वादमिळकतीच्या कोणत्या दिशेला आहे मला सांगता येणार नाही.

**६.** वादी क्र १ त्याची मिळकत सिटी सर्व्हे क्रमांक १३५० मध्ये राहतो. वादी क्र २ सिटी सर्व्हे क्रमांक १३५१ मध्ये राहतो. प्रतिवादी क्र १ ते ४ सिटी सर्व्हे क्रमांक १३५६ मध्ये राहतात. सन २०१८ साली सिटी सर्व्हे क्रमांक १३५६ ची मोजणी झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या मोजणीद्वारे सिटी सर्व्हे क्रमांक १३५६ च्या हद्दीखुणा कायम केल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, त्या हद्दीखुणाप्रमाणे प्रतिवादींनी त्यांच्या जागेत बांधकाम सुरु केले होते. प्रतिवादींनी सुरु केलेले बांधकाम कॉलमपर्यंत झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी केलेले बांधकाम सिटी सर्व्हे क्रमांक १३५६ मधील आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी वादमिळकतीमध्ये बांधकाम केले आहे असे मी खोटे सांगत आहे. वादमिळकतीची मोजणी झालेली आहे. माझ्या माहितीप्रमाणे कोर्टाच्या आदेशाने वादमिळकतीची मोजणी झालेली आहे. प्रतिवादींनी वादमिळकतीमध्ये अतिक्रमण केले आहे असे मी यावरुन सांगत आहे की, त्यांनी केलेल्या बांधकामामुळे मला जाणे-येण्यासाठी वादमिळकतीमध्ये रस्ता उरलेला नाही.

**७.** हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत दाव्यातील तुर्तातुर्त मनाई अर्ज मंजूर झाल्यानंतर मी सिटी सर्व्हे क्रमांक १३५० मध्ये बांधकाम केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी

वादमिळकतीमध्ये अतिक्रमण करुन बांधकाम केले आहे. वादमिळकत पुर्व-पश्चिम लांबीची आहे. सिटी सर्व्हे क्रमांक १३५० आणि सिटी सर्व्हे क्रमांक १३५६ समोरासमोर असून त्यांच्यामध्ये वादमिळकत आहे. मला सांगता येणार नाही की, वादमिळकतीची रुंदी ७ ते ८ फूट आहे किंवा कसे.

८. सिटी सर्व्हे क्रमांक १३५० मध्ये घरकुल योजनेअंतर्गत मला शासनाकडुन मदत मिळाली आहे आणि बांधकामासाठी मी कुर्डुवाडी नगर परिषदेची परवानगी घेतलेली आहे. सिटी सर्व्हे क्रमांक १३५० मध्ये बांधकाम करुन मी दोन खोल्या बांधल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सदर बांधकाम मी वादमिळकतीमध्ये अतिक्रमण करुन केलेले आहे.

९. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी सिटी सर्व्हे क्रमांक १३५६ मध्ये बांधकाम करीत असताना मी प्रस्तुतचा खोटा दावा दाखल करुन त्यांच्या बांधकामास हरकत घेतली आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी वादमिळकतीमध्ये अतिक्रमण केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, सिटी सर्व्हे क्रमांक १३५० मधील बांधकामाला प्रतिवादींनी हरकत घेतलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सिटी सर्व्हे क्रमांक १३५० पेक्षा सिटी सर्व्हे क्रमांक १३५६ चे क्षेत्र दुप्पट आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादमिळकतीमध्ये मी अतिक्रमण केल्याने मला तसेच प्रतिवादींना जाणे-येण्यासाठी जागा उरलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा दावा दाखल केला आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

वाचून दाखवले बरोबर आहे,

JAIN AKHIL OMPRAKASH

Digitally signed by JAIN AKHIL OMPRAKASH
Date: 2024.07.25 13:42:38 +0530

(अखिल जैन)

दिनांक - २५/०७/२०२४.

दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, माढा.